**अर्ज निशाणी ७ वरील आदेश**
**(दिनांक १५ जुलै, २०२६ रोजी पारीत)**

अर्जदाराने प्रस्तुतचे प्रकरण पासपोर्ट काढण्यासाठी ना हरकत मिळणेबाबत दाखल केले आहे. प्रस्तुत अर्ज मुळ अर्जामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याबाबत दाखल केला आहे. अर्जदाराने असे कथन केले आहे की, अर्जदाराचे नाव किरण चंद्रकांत पवार असे असुन टंकलेखनाच्या चुकीमुळे मुळ अर्जात अर्जदाराचे नाव नजरचुकीने किरण रामचंद्र पवार असे नमुद झाले आहे. त्यामुळे सदर नाव दुरुस्त होणे आवश्यक आहे. सरकारी वकिलांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन असे नमुद केले आहे की, सदर अर्ज कोणत्या तरतुदीनुसार दाखल केला याचा बोध होत नाही. तसेच योग्य तो आदेश करण्यात यावा अशी विनंती केली. अर्ज व त्यावरील म्हणणे चे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे युक्तिवाद ऐकला. अर्जदारातर्फे मागणी केलेली दुरुस्ती ही औपचारीक स्वरुपाची असल्याने सदर दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचीत होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. प्रस्तूतचा अर्ज **(निशाणी क्र. ७)** मागणी केल्याप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारास अर्जात मागणी केल्याप्रमाणे मुळ अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

SANTOSH LAXMAN VAIDYA
Digitally signed by SANTOSH LAXMAN VAIDYA
Date: 2026.07.15 17:03:33 +0530

**घोडेगाव**
**दिनांक १५/०७/२०२६**

(संतोष एल. वैद्य)
**प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, घोडेगाव**
**ता. आंबेगाव जि.पुणे**